जगभर

# विकिलिक्स, डच निवडणुका, लंडनला आतंकवादी पुनर्भेट

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

## विकिलिक्स

विविध देशातील गोपनीय पत्र-व्यवहार विकिलिक्स गेली अनेक वर्षे अचानकपणे उघड करत आहे. (याचा पूर्वीच्या 'आंदोलन'मध्ये सविस्तर आढावा घेतलेला आहे.) ही इंटरनेट तस्करी असली तरी तिने उघड होणारी माहिती अखेर जगातल्या सामान्य नागरिकाला त्यांच्या देशांचे खरे चेहरे दाखवते. देशांची अधिकृत सार्वजनिक भूमिका एक असते तर राजकीय-शासकीय पदाधिकाऱ्यान्च्या अंतर्गत 'खाजगी' संदेशातून दिसणारी अंतस्थ व 'खरी' भूमिका निराळी, प्रसंगी अगदी विरुद्ध असते. विकिलिक्स हा उद्योग स्वतंत्रपणे व कोणत्याही देशाचा कायदा न मानता करते. हे सामान्य नागरिकाचे मोठेच सक्षमीकरण आहे. गेल्या दहा वर्षात या ना-नफा संघटनेने अनेक देशांचा , विशेषत: अमेरिकेचा मुखभंग केलेला आहे.

७ मार्चला विकिलिक्सने सुमारे ८-९००० इलेक्ट्रॉनिक माहितीपत्रे प्रसिद्ध केली. त्यानुसार अमेरिकेची गुप्त-हेर संघटना - सी आय ए - सामान्य नागरिकांपासून संस्थांपर्यंत सगळ्या स्तरांवर खाजगी माहिती सर्रास मिळवते हे पुन्हा उघड केले. (चार वर्षांपूर्वी एडवर्ड स्नोडेन या सी आय ए च्या एका कंत्राटदाराकडे नोकरीला असणाऱ्या इसमाने असाच पहिला धक्का दिला होता.) रोजच्या वापरातील मोबाईल फोन, वेब कॅम, कॉम्प्युटरसारखी साधने; आंतरराष्ट्रीय संभाषणांचे स्काईपसारखे प्रोग्रॅम इत्यादींवरून सी आय ए सतत माहिती मिळवते. ती मिळवण्यासाठी apple, google, microsoft या आघाडीवरच्या software कंपन्यांच्या प्रोग्रॅम्समधील त्रुटी शोधण्यात येतात. त्या त्रुटींचा फायदा घेऊन ग्राहकाचे फोन, कॉम्प्युटर 'करप्ट' केले जातात. प्रसंगी कॉम्प्युटर/ फोनला बाधक असे programs ही माझ्या व मूळ software देणाऱ्या (apple वगैरे) कंपनीच्या नकळत माझ्या साधनात सोडले जातात. ही जासूसी. मग मी कोणाशी मोबाईलवर काय बोलतो, काय एस एम एस पाठवतो हे तत्क्षणी सी आय एला कळते. कितीही प्रगत anti-virusप्रोग्रॅम माझ्या कॉम्पुटर वर असला तरी तो निष्प्रभ करून माझ्या कॉम्पुटरवर असाच प्रवेश मिळवला जातो.. स्मार्टफोनवरून इमेजेस चोरणे, घरातल्या स्मार्ट टीवीवर software सरकवणे - हे software टी वी 'बंद' केला आहे असे वाटत असले, तरी तो चालू ठेवते आणि त्या खोलीतील माणसांचे विडीओ रेकोर्डिंग सी आय ए पाहू शकते. खाजगी कार मधल्या software ने ती कार कोठे चालली आहे, तिच्यात कोण आहे - ही माहिती प्रत्यक्ष देखरेख करणारे मानवी गुप्तहेर न नेमता सी आय एला ऑफिसात कळू शकते. विकिलिक्सच्या मते या गुप्तहेरीने एखाद्याचा खून करणे सहज शक्य आहे. अशा खुनाचा उलगडा कधीच होणार नाही. जर काहीतरी गडबड आहे असे माझ्या लक्षात आलेच, तर प्रोग्रॅम कोणी बसवला त्याचा रोख तिसरीकडेच जातो. असे अनैतिक व्यवहार सी आय ए स्थापनेपासूनच करत आहे, आता विकसित माहिती-तंत्राची त्यात भर पडली आहे. त्यामुळे अमेरिकन सरकारचा नागरी जीवनातील हस्तक्षेप अतोनात विस्तारला आहे. आजवर अशा खुफिया कारवाया शत्रू-राष्ट्रांविरुद्ध करण्यात येत असत व त्याला नागरिकांची मूक संमतीही असे.

पण या अलीकडच्या प्रकरणातील गुंतागुंत निराळीच आहे. एक तर सी आय ए स्वत: अगदी थोडेच software बनवते. बहुतांशी software त्या क्षेत्रातील खाजगी कंपन्यांकडून विकत घेतले जाते. म्हणजे, एक तर सी आय एतील एखाद्या कर्मचाऱ्याने ही माहिती विकिलिक्सला पुरवली असावी किंवा अशा software कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्याने. या शक्यतेमुळे सी आय ए आणि या software कंपन्या यांच्यातील विश्वासाला तडा गेला आहे. (२०१३ च्या स्नोडेन प्रकरणानंतर अशीच वेळ आली होती. मग या दोघांचे संबंध सौहार्दपूर्ण राहावेत म्हणून ओबामा राजवटीने प्रयत्न केला होता. ते आता दिसत नाही - पुढे स्पष्ट होईल.) विकिलिक्सचा माहितीचा स्रोत कोणताही असला तरी ही राष्ट्राच्या सुरक्षेला धक्का देणारी घटना आहे. दुसरे म्हणजे, ज्यांना स्वत:ची गुपिते राखता येत नाहीत, ती सी आय ए काय क्षमतेची गुप्तहेर संघटना म्हणायची! यंत्रणेच्या इभ्रतीलाच मोठा धक्का बसला आहे. सी आय ए ने जे खोडसाळ programs apple वगैरेच्या उत्पादनात घुसवले, ते प्रोग्रॅम पोरकट होते असा कंपन्यांचा निष्कर्ष आहे. म्हणजे सी आय ए ची तांत्रिक क्षमताही सुमार दिसते. शिवाय विकिलिक्सच्या मते सी आय ए ची स्वत:चीच सुरक्षा इतकी ढिसाळ आहे, की उठसूट कोणताही पोरसवदा तंत्रज्ञ ती भेदू शकेल.

त्यात भर म्हणून अध्यक्षीय निवडणुकीदरम्यान क्लिंटन

बाईन्च्या प्रचारप्रमुखाच्या इमेल्स प्रसिद्ध करून विकिलिक्सने त्यांना अडचणीत आणले होते. तेव्हा ट्रम्पने विकिलिक्सचा उदो उदो केला होता. तर हे कृत्य रशियाचे असावे आणि त्या देशाने ही माहिती विकिलिक्सला पुरवली असा क्लिंटनच्या पक्षाचा दावा होता. आताही विकिलिक्सच्या या माहितीमुळे अमेरिकन सरकारला अडचणीत आणण्यामागे रशिया असावा असे म्हटले जाते. पण शेवटी गुप्तहेर संघटना हे सरकारचेच एक खाते आहे. आणि अशा वेळी सरकारने त्याची पाठराखण करणे अपेक्षित असते. पण ट्रम्पमहाशयांनी आजवर निरनिराळ्या संदर्भात सी आय एच्या विश्वासार्हतेवर पुरेशी राळ उडवली आहे. सध्या अध्यक्षीय निवडणुकातील रशियाच्या संशयित ढवळाढवळीची चौकशीही चालू आहे. त्या आधी ट्रम्पने नेमलेल्या देशाच्या नव-नियुक्त सुरक्षा प्रमुखाला निवडणुकीदरम्यान रशियाशी नव्या धोरणांची चर्चा केल्याचे आणि रशियाकडून पैसे घेतल्याचे उघडकीला आल्याने तीन आठवड्यातच राजीनामा द्यायला लागला होता. त्याला ट्रम्पचा तरीही पाठींबा होता.

याचा टोकाचा परिणाम म्हणजे, ट्रम्प रशियाला झुकते माप देत आहे कारण रशियाकडे ट्रम्पला blackmail करू शकणारे पुरावे असावेत इथपर्यंत तर्क होत आहेत.

भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाचा संकेत म्हणजे, एखाद्या राष्ट्राला खच्ची करायला आधुनिक शत्रास्त्रे, प्रचंड सैन्य या पारंपारिक युद्धाच्या साधनांची जरुरी नाही. माहिती तंत्रज्ञानाच्या जोरावर कोणीही साधा तंत्रज्ञ जवळजवळ फुकट, पडद्यामागे राहून, जगाच्या कोणत्याही काना-कोपऱ्यातून अगदी अमेरिकेसारख्या महासत्तेला जेरीला आणू शकतो हे दिसले आहे.

## हॉलंडमधील निवडणुका

गेली काही वर्षे पश्चिमेत (अमेरिका व युरप - ब्रिटन, फ्रांस, हॉलंड, जर्मनी, ग्रीस - इत्यादी) राष्ट्रवाद जोमात आहे. तो धर्म-वंश-वर्ण यावर आधारित आहे. आमची (गोरी) अस्मिता, आमची (गोरी) संस्कृती धोक्यात आणणारे बाहेरचे नकोत. विशेषत: मुस्लीम नकोत. या लोकांना प्रवेशच बंद करा, आहेत त्यांना बाहेर काढा अशा भूमिकेला लोकमान्यता मिळत आहे असे चित्र आहे. हा २००८ ची जागतिक आर्थिक आणीबाणी, मुस्लीम आतंकवाद आणि सध्याचे विशेषत: सिरीयन निर्वासितांचे युरपकडे येणारे लोंढे याचा परिणाम आहे.

त्याचे आविष्कार आधी ब्रेक्झिट (ब्रिटनने युरोपिअन युनिअन सोडावी), मग ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष होणे यात दिसले. १५ मार्चला या पार्श्वभूमीवर हॉलंडमध्ये सार्वत्रिक निवडणुका झाल्या. म्हणून त्यांची दखल घेणे आवश्यक. तेथे एक अति-उजवा पक्ष गेले दशकभर सक्रिय आहे. याचा नेता Geert Wilders. त्याच्या मते हॉलंडचे इस्लामीकरण होत आहे आणि ते ताबडतोब थांबवले पाहिजे. कुराण हिटलरच्या लिखाणासारखे आहे, देशात जास्तीच्या मशिदी नकोत , हॉलंडने युरोपिअन युनिअनमधून बाहेर पडायला पाहिजे, इत्यादी. लोकक्षोभ वाढवणे हे तंत्र उजव्या शक्ती वापरतात. मागच्या पिढीपर्यंत तरी हॉलंड हा देश मुस्लिमांना आश्रय देत असे. १९७० च्या दशकांपासून मोरोक्कन, तुर्क आले; नंतर १९९० च्या दशकात ख्रिश्चनांच्या हत्याकांडाचे बळी बोस्निअन मुस्लीम आले, मग तलेबानच्या दहशतीपासून पळ काढणारे अफगाण आले. ते त्या समाजात सामावले गेले आणि आता तेथे त्यांची दुसरी किंवा तिसरी पिढी आहे. उदा. Rotterdam या हॉलंडमधील लोकसंख्येनुसार दुसऱ्या मोठ्या शहराचा महापौर मोरोक्कोहून स्थलांतरित झालेला मुस्लीम आहे आणि त्या शहरात १७४ देशांचे लोक रहातात. (हीच गोष्ट फ्रांसची. पण तेथेही मारीन पेन नावाची अति-उजव्या - 'फ्रांस फक्त (गोऱ्या) फ्रेंचांसाठी' - हा कार्यक्रम घोषित करणाऱ्या पक्षाची नेता आहे.)

१५ मार्चच्या सार्वत्रिक निवडणुकांविषयी त्यामुळे औत्सुक्य होते. आधीच्या अंदाजानुसार Wilders च्या पक्षाला बहुमत नाही तरी जास्तीत जास्त जागा मिळणे अपेक्षित होते. तसे झाले नाही. आधीच्या सत्ताधारी पक्षाचे बळ घटले पण तरी तो सगळ्यात मोठा पक्ष ठरला. त्याला एकूण १५० जागांपैकी ३३ जागा मिळाल्या. Wilders च्या पक्षाला २०. इतर ११ पक्षांना त्याहून कमी - २ ते १९. बहुतेक पक्षांनी कोणत्याही परिस्थितीत आम्ही Wilders च्या पक्षाशी हात-मिळवणी करणार नाही असे जाहीर केले आहे. त्यामुळे तो पक्ष एकटा पडण्याची शक्यता दिसते.

पुढच्या महिन्यात फ्रांसमध्ये अध्यक्षीय निवडणुका आहेत. त्यात वर उल्लेख केलेल्या मारीन पेन प्रमुख उमेदवार आहेत. पुढच्या वर्षी जर्मनीत सार्वत्रिक निवडणुका आहेत, नंतर इटलीमध्येही. हॉलंडमधील अतिउजव्यांची पीछेहाट तेथेही दिसेल का हे लवकरच कळेल.

## लंडनमधील आतंकवादी हल्ला

२२ मार्चला दुपारी लंडनमधील ब्रिटीश संसदेच्या बाहेरच आतंकवादी हल्ला झाला. संसदेच्या जवळच्या थेम्स नदीवरील पुलावर आतंकवाद्याने मोटारकार फुटपाथवर चढवली व भरधाव जात पादचाऱ्यांना चेंगरले. त्यात तीन लोक मृत्यू पावले (अधिक एक नंतर) तर चाळीस जखमी झाले. त्यातील सहा-सात जणांची परिस्थिती गंभीर आहे.

मग या इसमाने गाडी संसदेच्या इमारतीच्या कुंपणावर आदळली व तो बाहेर आला, त्याचा इरादा इमारतीत घुसण्याचा होता. संसदेचे अधिवेशन चालू असल्याने ब्रिटीश पंतप्रधान, मंत्रिमंडळ व खासदार संसदेत उपस्थित होते. त्याला कामावर असणाऱ्या दोन पोलिसांनी अटकाव केला. त्यातील एकाला त्याने

सुरीने भोसकून ठार मारले, नंतर पोलिसांनी त्याला गोळ्या घालून ठार केले. मृत व जखमी पादचारी बहुतांशी परदेशी पर्यटक आहेत.

आतंकवादी ५२ वर्षांचा ब्रिटनमध्येच जन्माला आलेला खालिद मसूद नावाचा धर्मांतरित मुस्लीम. तो मिश्रवंशीय होता. अनेकदा तुरुंगात होता, त्यादरम्यान तो मूलतत्त्ववादी मुस्लीम झाला असावा. तो हिंसक गुन्हेगार म्हणून पोलिसांना माहिती होता पण त्याचा आतंकवादी चेहरा सुप्त होता. त्यामुळे पोलिसांकडे असणाऱ्या अशा संशयित तीन हजार लोकांमध्ये त्याचे नाव आही. लेख लिहिण्याच्या वेळी तरी त्याने हा हल्ला स्वत:हून केला असावा असे पोलिसांचे मत आहे. म्हणजे आंतरराष्ट्रीय आतंकवादी संघटनांशी त्याचे लागेबांधे नसावेत. तरीही इस्लामिक स्टेटने हा आमचाच सैनिक होता असे तातडीने जाहीर केले. अशी कोणतीही घटना झाली की त्याचे ’श्रेय’ स्टेट घेते, त्यात सत्य असो व नसो. सार्वजनिक घबराट आणि विद्वेष वाढवणे हा उद्देश सफल झालेला असतो. पण या प्रसंगी अजून या माणसाच्या स्टेटशी संबंधाचा निर्देश नाही.

२२ मार्च ही तारीख महत्त्वाची. याच दिवशी मागच्यावर्षी बेल्जियम देशाच्या ब्रसेल्स या राजधानीत आतंकवादी हल्ला झाला होता. त्यात बत्तीस नागरिक मरण पावले होते आणि तीनशेहून अधिक जखमी झाले होते. त्या हल्ल्यांचे नियोजन इस्लामिक स्टेटचे होते. या २२ मार्चला ब्रसेल्समध्ये वर्षापूर्वीच्या घटनेनिमित्त शोकसभा चालू होत्या. तेव्हाच Antwerp नावाच्या बेल्जियममधील दुसऱ्या एका शहरात लंडनमधील पादचाऱ्यांना चेंगरून मारण्यासारखाच कट तेथील पोलिसांनी अयशस्वी केला. (या आधी जर्मनी व फ्रांसमध्ये असे हिंसक प्रकार झालेले आहेत. फ्रांसमध्ये तर २०१६ साली नीस नावाच्या शहरात एका माथेफिरूने ट्रकने ८५ हून जास्त लोक चिरडले होते. ही सगळी इस्लामी भगतांची करतूत.)

वाहन पादचाऱ्यांवर बेगुमानपणे घालण्याचे दहशतवादाचे नवे तंत्र दिसते. त्यासाठी द्वेषाखेरीज पूर्वतयारीही लागत नाही. आणि उठसूठ कोणीही भगत ते कोठेही करू शकतो.

या हल्ल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ब्रिटीश संसदेने कामकाज चालू ठेवले. दहशतवादाला आम्ही घाबरत नाही ही भूमिका. संसदेत भाषण करताना पंतप्रधान थेरेसा मे यांनी अपेक्षित मुद्दे मांडले. त्यातले ’हा लोकशाही, आमची मूल्ये, तत्त्वे यांवरचा हल्ला आहे’ हे विधान संशयास्पद आहे. अफगाणिस्तान, इराक ही युद्धे अमेरिकेचे लांगूलचालन करण्यासाठी ब्रिटनने त्यांच्यावर लादली. त्यात लाखात निष्पाप बळी पडले. त्याची प्रतिक्रिया विकृत मुस्लीम अस्मितेत युरोपभर उमटत आहे. हे अशा हल्ल्यांचे मूळ आहे. तरीही या विशिष्ट हल्ल्यामागे फार खोलात जाण्यात अर्थ दिसत नाही. हा सामान्य गुन्हेगार दिसतो. विध्वंसासाठी विध्वंस एवढाच भाग नक्की दिसतो. त्याला इस्लामिक स्टेटचा आदर्शवाद चिकवटणे व त्याविरुद्ध ‘आमचा मुक्त समाज, लोकशाही’ हे चित्र उभे करणे म्हणजे एका गुन्ह्याला उदात्त करणे आहे. (आपल्या संसदेवर २००१ला झालेला हल्ला व लंडनमधील २००५ चे हल्ले गुणात्मकदृष्ट्या वेगळे होते. त्यामागे संघटना होती.)

कितीही पोलीस, गुप्तहेर, सैन्य राष्ट्राच्या दिमतीला असले तरी दुर्दैवाने असे वैयक्तिक व सामूहिक प्रसंग जगभर नवीन ’नॉर्मल’ होऊ लागले आहे.

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*